
पुढारी दि. 14.10.25

# २० लाखांचे अँन्ड्रॉइड मोबाईल जप्त

## सायबर सेलची कामगिरी

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** शहर व जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागातील दररोज मोबाईल चोरीच्या घटना वाढलेल्या असताना आज सायबर शाखेने सुमारे २० लाख रुपयांचे मोबाईल जप्त करून काही अंशी दिलासा दिला आहे.




शहराच्या वेगवेगळ्या भागातून मोठ्या प्रमाणावर मोबाईल चोरीच्या घटना घडत आहेत. विशेषतः आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणाहून होणारी मोबाईल चोरी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरली आहे. अनेक प्रकरणात वेगवेगळ्या कारणावरून पोलीस ठाण्यातील अधिकारी फिर्यादीची चौकशी करून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करतात, असा अनुभव आहे. केवळ हरवला आहे एवढीच नोंद करून पोलीस आपली जबाबदारी झटकत असल्याने मोबाईल चोरट्यांचे मनोधैर्य दिवसेंदिवस वाढत चालले आहे. वाढत्या मोबाईल चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सायबर सेलच्या अधिकाऱ्यांना विशेष सूचना दिल्या होत्या. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अति. पोलीस अधिक्षक सुरज गूरव यांच्या सूचनेनुसार विशेष मोहीम हाती घेण्यात आली. या मोहिमेअंतर्गत जवळपास १५० अँन्ड्रॉइड मोबाईल जप्त करण्यात आले. या मोबाईलची किंमत २० लाख १० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. आज आवश्यक ती ओळख पटवून काही जणांना हे मोबाईल परत देण्यात आले.

मोबाईल परत मिळाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले. सायबर सेलचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, पोलीस उपनिरीक्षक एम. बी. चव्हाण, दीपक ओढणे, महेश बडगू, कांचन कसबे, शुभांगी जाधव, दावीद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दीपक राठोड, साई शेंडगे यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.